ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे माहेरघर - मा.खा. कल्याणाप्पा आवाडे

"ग्रंथालय ही ज्ञानाचे माहेरघर असून आजच्या डिजिटल युगात देखील ग्रंथालय आपले वेगळेपण सिद्ध करत आहेत. विद्यार्थ्यांनी आपले उज्वल करिअर घडवण्यासाठी ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथाचा वापर करून आपले करिअर करणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन माजी खासदार कल्याणाप्पा आवाडे यांनी केले. ते व्यंकटेश महाविद्यालयामध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या सुसज्ज व प्रशस्त अशा स्व. श्रीमानशेठ मदनलालजी बोहरा ग्रंथालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नारायणराव बाबासाहेब एज्यु. सोसायटीचे प्रेसिडेंट श्रीनिवासजी बोहरा शेठजी हे होते. सदर ग्रंथालयाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे चेअरमन कृष्णा बोहरा, विश्वस्त ॲड. सत्यनारायण ओझा, मारूतराव निमणकर, श्रीकांतजी चंगेडिया, महेशजी बांदवलकर, अहमद मुजावर, अशोकजी जोशी, रामकिशोरजी तिवारी यासह राजेंद्रजी बोहरा आदी मान्यवर उपस्थित होते.सदर कार्यक्रम प्रसंगी व्यंकटेश महाविद्यालयाच्या विविध वर्गखोल्यांसाठी देणगी दिलेले मकरंद चितळे, आशा बोहरा, सोनल बोहरा, प्रिया बोहरा, तेजराज सोलंकी, भैरवनाथ टेक्स्टाईलचे शरद देसाई आदी देणगीदारांचा याप्रसंगी माजी खासदार आवाडेदादा यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.सदर कार्यक्रमप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगताद्वारे संस्थेचे प्रेसिडेंट श्रीनिवासजी बोहरा (शेठजी) यांनी श्री. ना.बा.एज्युकेशन सोसायटीच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच आदरणीय आवाडेदादा व स्व. मदनलालजी बोहरा शेठजी यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ग्रंथपाल श्री एम पी केसरकर यांनी संपूर्ण ग्रंथालय परिसर व त्याची माहिती प्रमुख पाहुण्यांना करून दिली.सदर कार्यक्रम प्रसंगी गोविंदराव हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. एस. चिंचवाडे, गंगामाई गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका एस. एस. गोंदकर, ना.बा. बालमंदिर व विद्यामंदिरच्या भगत मॅडम, पाटील मॅडम यासह झपाटे सर, ए.आय. बाणदार, शेखर शहा यासह व्यंकटेश महाविद्यालय व नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीच्या विविध ज्ञान शाखातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सोनल हरिष बोहरा यांना नारीशक्ती पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचाही आवाडे दादा यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार युवराज मोहिते यांनी मांडले.


SHIVAJI UNIVERSITY
DISTANCE EDUCATION
STUDY CENTRE
सारंग दास,इचल.